पदवीधर शिक्षक मतदारसंघाच्या मतदार यादी व लागू झालेल्या आचार संहितेबाबत तसेच निवडणूक प्रक्रियाबाबत दिनांक २३/०५/२०१४ रोजी झालेल्या राजकिय पक्षाच्या सभेचे इतिवृत्तांत

सभेस उपस्थित.

१. श्री मनिष आण्णाराव गडदे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस
२. श्री मल्लेश लक्ष्मीनारायण बडगु राष्ट्रवादी कॉंग्रेस
३. श्री विक्रम बापूसाहेब देशमुख भारतीय जनता पक्ष
४. श्री शंकरराव वाघमारे आमदार चंद्रकांत दादा पाटील यांचे प्रतिनिधी
५. श्री सकुमार कृष्ण सिध्दिम आमदार चंद्रकांत दादा पाटील यांचे प्रतिनिधी

प्रथमता मा. उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पदवीधर शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०१४ करीता मा. भारत निवडणूक आयोग दिल्ली यांचकडील पत्र क्र. ECI/PN/२६/२०१४ दि. २० मे २०१४ अन्वये पदवीधर व शिक्षक मतदार संघ निवडणूक २०१४ करीताचा कार्यक्रम जाहीर झाला असून सदरहू निवडणूकीची आचार संहिता दि. २०/०५/२०१४ पासून लागू झाली आहे. सदरहू आचार संहितेचा अंमल संपुर्ण जिल्हयाकरीता लागू आहे. तरी मा. भारत निवडणूक आयोगाच्या आदर्श आचार संहितेचे तंतोतंत पालन करण्यात यावे. आयोगाच्या दिनांक २०/०५/२०१४ च्या पत्रानुसार निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे असे सांगितले.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रसिध्दी दिनांक | मंगळवार दि. २७/०५/२०१४ |
| २ | नामनिर्देशन अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख | मंगळवार दि. ०३/०६/२०१४ |
| ३ | नामनिर्देशन अर्जाची छाननी | बुधवार दि. ०४/०६/२०१४ |
| ४ | नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची तारीख | शुक्रवार दि. ०६/०६/२०१४ |
| ५ | निवडणूकीचा दिनांक | शुक्रवार दि. २०/०६/२०१४ |
| ६ | मतमोजणी दिनांक | मंगळवार दि. २४/०६/२०१४ |

पदवीधर शिक्षक मतदारसंघाच्या मतदार यादीबाबत मा. भारत निवडणूक आयोगाने दि. ०१/११/२०१३ या अर्हता दिनांकावर आधारीत शिक्षक व पदवीधर मतदारसंघातील मतदार नोंदणी कार्यक्रम घोषित केला होता. त्यास अनुसरुन दि. ०१/०२/२०१४ रोजी शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या मतदार यादयांची अंतीम प्रसिध्दी करण्यात आलेली आहे असे सांगितले.

तथापी लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० मधील कलम २३ (३) नुसार पदवीधर/शिक्षक मतदार संघातील निवडणूकी संदर्भात नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या अंतीम दिनांकापर्यंत (०३/०६/२०१४) मतदार नोंदणी प्रक्रिया चालू राहील. त्यामुळे शिक्षक / पदवीधर मतदारसंघातील मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी झाल्यानंतर देखील मतदार नोंदणी प्रक्रिया निरंतर पुनरिक्षणांतर्गत चालू ठेवणे आवश्यक आहे असे सांगितले.

पदवीधर मतदारसंघाकरीता मतदारांना नाव नोंदणीकरिता सोलापूर जिल्हयातील सहा. मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय तसेच तहसिलदार कार्यालय येथे जे मतदार त्या मतदारसंघातील सर्वसाधारण रहिवासी आहेत आणि ०१ नोव्हेंबर २०१३ पुर्वी किमान ३ वर्ष पदवीधर असेल (दि. ०१/११/२०१० या अर्हता दिनांक) अशी प्रत्येक व्यक्ती मतदार यादीमध्ये नाव समाविष्ठ करण्यास पात्र आहे असे सांगितले. पदवीधर मतदारसंघाकरीता मतदाराने फार्म नं. १८ दुबार प्रतित भरुन देणे तसेच निवडणूक ओळखपत्र क्रमांक नमूद करुन सोबत ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे. सदरचा फार्म संबंधित मतदाराने जिल्हयातील पदनिर्देशित अधिकारी यांचेकडे व्यक्तीशः आणून दयावयाचा आहे. अर्ज गठ्ठा पध्दतीने कोणाकडूनही स्विकारले जाणार नाहीत. पदवीधर मतदारसंघासाठी मतदाराने नमूना फार्म क्र. १८ सोबत त्यांनी पास झालेल्या डिग्री, डिप्लोमा सर्टीफिकेटची / मार्कलिस्ट साक्षांकित प्रत जोडावी. तसेच शासकीय सेवेमध्ये असणा-या कर्मचा-यांचे संबंधित विभागातील कार्यालय प्रमुखाने त्यांचेकडील उपलब्ध असलेल्या रेकॉर्डची प्रत देता येईल. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार जे पदवीधर मतदारांसाठी पात्र आहेत अशाच मतदाराने नमूना १८ चा फार्म भरुन द्यावा. मतदाराने नमूना १८ चा फार्म पदनिर्देशित अधिकारी यांनी त्यांची छाननी केल्यानंतर मूळ सर्टीफिकेट वरुन तपासले व योग्य आहे व मुळ सर्टीफिकेट वरुन तपासले अयोग्य आहे. अशा प्रकारचा शेरा नमूद करतील, जर मतदाराने त्यांचा नमूना १८ चा फार्म पोस्टाने पाठविल्यास उपविभागीय अधिकारी हे संबंधित मतदारास नोटीस पाठवून त्यांच्या समोर व्यक्तीशः उपस्थित राहणेबाबत तारीख देतील व त्यानुसार मतदाराने उपस्थित राहून त्यांचे मुळ सर्टीफिकेट सादर करावे. जर मतदाराने मुळ सर्टीफिकेट सादर केले नसल्यास त्यांचा अर्ज नामंजुर करण्यात येईल असे सांगितले.

शिक्षक मतदारसंघाकरीता मतदारांना नाव नोंदणीकरिता ०१ नोव्हेंबर २०१३ पुर्वी सलग ६ वर्षापैकी किमान ३ वर्ष शिक्षकाचे पुर्णवेळ काम करणारी व्यक्ती मतदार यादीमध्ये नाव नोंदणीस पात्र असेल. तथापी अर्धवेळ सेवेतील शिक्षक पात्र असणार नाहीत. मतदार हा सर्वसाधारणपणे त्याच शिक्षक मतदारसंघातील रहीवासी असावा. शिक्षक मतदारसंघासाठी भारत निवडणूक आयोगाने विहीत केलेला नमूना क्र. १९ हा फार्म भरुन देणे आवश्यक आहे. निवडणूक ओळखपत्र क्रमांक नमूद करुन सोबत निवडणूक ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे असे सांगितले.

फार्मसोबत संबधित शिक्षकांच्या सेवेच्या तपशिलाकरीता संस्था प्रमुखांचे प्रमाणपत्र देणे (Annexure-II) आवश्यक आहे. या अंतर्गत संबंधित शिक्षक हा माध्यमिक शाळेचा कर्मचारी असणे आवश्यक आहे. शिक्षक मतदारसंघातील अर्ज गठ्ठा पध्दतीने स्विकारले जाणार नाहीत. सदर निवडणूकीसाठी पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या यादया तयार करण्याच्या

कार्यक्रमाबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा निवडणूक कार्यालय, उपविभागीय कार्यालय व तहसिलदार कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा. त्याकरीता सोलापूर जिल्हयाचे संकेत स्थळ www.solapur.nic.in यावर सर्व संबंधित केंद्रीय स्तरीय अधिकारी व मतदार सहाय्यता केंद्रप्रमुख यांचे व त्यांचे व त्यांच्या कार्यालयाचे दुरध्वनी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

तसेच शिक्षक मतदारसंघामध्ये सोलापूर जिल्हयामध्ये ७७६० नावे जिल्हयाचे वगळणी करणेत आलेली असून यामधील बहुतांश नावे ही शिक्षकांना सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे त्याचे सेवेचा तपशिल (Annexure II) दिलेला नसलेने वगळलेली आहेत. तरी सर्वांनी वगळणी केलेले मतदारांची यादी सोलापूर जिल्हयाचे संकेत स्थळ www.solapur.nic.in यावर किंवा तहसिल कार्यालयात तपासून घ्यावीत व जर पात्र मतदार वगळले असतील तर त्यांनी पुन्हा फार्म १९ त्यांचे सेवेचे तपशिलसह भरुन घेऊन दिनांक ३ जून पुर्वी सादर केल्यास त्यांच्या नावाचा समावेश करता येईल. तसेच सर्व २००८ चे यादीतील मतदार मुळ यादीत समाविष्ट असलेची खात्री करावी असे सांगितले.

वरील बाबीवर सविस्तर चर्चा केलेनंतर श्री. विक्रम बापूसाहेब देशमुख यांनी सदर निवडणूक करीता स्वतंत्र BLO नियुक्त करावेत असे सुचविले तथापि मा. जिल्हाधिकारी यांनी BLO नियुक्त करण्यात आलेले असून त्यांची यादी सोलापूर जिल्हयाचे संकेत स्थळ www.solapur.nic.in यावर सर्व संबंधित केंद्रीय स्तरीय अधिकारी व मतदार सहाय्यता केंद्रप्रमुख यांचे व त्यांच्या कार्यालयाचे दुरध्वनी उपलब्ध आहेत असे सांगितले.

तसेच श्री. मनिष गडदे यांनी उत्तर सोलापूर करिता अर्जाचे संख्या पाहता स्वतंत्र कक्ष स्थापन करावे असे सुचविले. त्यावर मा. जिल्हाधिकारी यांनी तालुका स्तरावर मतदार मदत केंद्र स्थापन करण्यात आले आहे असे सांगितले. त्यामध्ये पदवीधर व शिक्षक मतदारसंघासाठी स्वतंत्र अव्वल कारकूनाची नियुक्ती करावी असे सुचना दिल्या.

श्री. शंकरराव वाघमारे यांनी एकूण एकंदर ६ लाख मतदार पैकी ८० हजार मतदार दुबार आहे असे सांगितले. त्यावर उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी अल्फाबेटिकल मतदारयादी तयार करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यामध्ये आढळून येणारी दुबार नावे वगळणी करणेत येतील असे सांगितले.

श्री. विक्रम बापुसाहेब जाधव यांनी शिक्षक मतदार यादीमध्ये झालेल्या वगळणीची यादी उपलब्ध करुन दयावी असे सांगितले. त्यावर मा. जिल्हाधिकारी यांनी सदरहू यादी सोलापूर जिल्हयाचे संकेत स्थळ www.solapur.nic.in यावर उपलब्ध करुन देत असल्याची सांगितले.

वरील बाबींवर सविस्तर चर्चा करुन मा. उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपलेचे जाहीर केले.

(डॉ. प्रवीण गेडाम)
जिल्हाधिकारी सोलापूर

क्र.निवडणूक/कार्या/१६/आरआर/
दि.    /    /२०१४

प्रत ---------------------------------------------------------------------------- माहितीस्तव